# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 22 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २२ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- अटल निवृत्ती योजनेला पाच वर्ष मुदतवाढीचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- दशकभरापेक्षा कमी कालावधीत महाराष्ट्रात ऊर्जा क्षेत्रात आमुलाग्र बदल– दावोस परिषदेत मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- राज्यातल्या २९ महापौर आरक्षणासाठी आज मंत्रालयात सोडत प्रक्रिया
- शिवसेना तसंच राष्ट्रवादी काँग्रेस नाव आणि चिन्ह प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात उद्या अंतिम युक्तिवाद
- प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा मराठवाड्यातील निमंत्रितांमध्ये उत्साह

आणि

- नागपूर टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा न्यूझीलंडवर ४८ धावांनी विजय

****

अटल निवृत्ती योजनेला आर्थिक वर्ष २०३०–३१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या योजनेच्या प्रचार आणि विकासात्मक उपक्रमांसाठी सरकारकडून दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्यालाही मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली.

भारतीय लघु उद्योग विकास बँक–सिडबीला इक्विटीच्या स्वरूपात पाच हजार कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा आहे.

****

राष्ट्रीय वीज धोरण २०२६ चा मसुदा केंद्र सरकारनं काल जाहीर केला. राज्य वीज नियामक आयोगानं वीजेच्या दरांच्या संदर्भात आदेश दिला नाही, तर योग्य निर्देशांकाच्या आधारे वीजेचे दर प्रत्येक वर्षी बदलण्याची शिफारस या मसुद्यात आहे. ग्राहकांना तसंच रेल्वे, मेट्रो आणि विविध उद्योगांना दिल्या जाणाऱ्या अनुदानात सुसुत्रीकरण करण्याची शिफारसही या मसुद्यात आहे.

****

महाराष्ट्राने दशकभरापेक्षा कमी कालावधीत ऊर्जा क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. दावोस इथं जागतिक आर्थिक परिषदेत सौर ऊर्जेसंदर्भात झालेल्या एका परिसंवादात ते बोलत होते.

दरम्यान, तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड–पेण ग्रोथ सेंटरची घोषणा मुख्यमंत्र्यांनी दावोस इथं केली. नवी मुंबई विमानतळापासून सुमारे वीस किलोमीटर अंतरावर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. अनेक गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत आज काढण्यात येणार आहे. मंत्रालयात सकाळी ११ वाजता ही प्रक्रिया सुरू होईल.

दरम्यान, कल्याण - डोंबिवली महापालिकेत शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय मनसेनं घेतला आहे. कल्याणचे माजी आमदार राजू पाटील यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन पाठिंबा जाहीर केला. १२२ सदस्य असलेल्या या महापालिकेत शिवसेनेचे ५३, भाजपाचे ५० तर मनसेचे ५ नगरसेवक आहेत.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. अखेरच्या दिवशी अनेक इच्छुकांनी अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी केल्याचं दिसून आलं. या अर्जांची आज छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. तीन फेब्रुवारीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि पाच फेब्रुवारीला सकाळी साडे सात ते संध्याकाळी साडे पाच वाजेदरम्यान मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या गणासाठी प्रत्येकी एक अशी दोन मतं द्यावी लागतील.

✲✲

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या निवडणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची उमेदवारांची यादी काल जाहीर केली. जिल्हा परिषदेसाठी ३६ तर पंचायत समितीसाठी ७६ उमेदवार पक्षाने निवडणूक रिंगणात उतरवले आहेत.

भाजपने जिल्हा परिषदेसाठी २७ तर पंचायत समितीसाठी ५४ उमेदवारांची नावं जाहीर केली. शिवसेनेनं अनुक्रमे २५ आणि ५० उमेदवार जाहीर केले आहेत.

लातूर जिल्हा परिषदेसाठी एकूण ५९८, तर पंचायत समितीसाठी ९५२ उमेदवारी अर्ज दाखल झाले.

✲✲

दरम्यान, धाराशिव जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत महायुती बहुतांश ठिकाणी एकत्रित लढत देणार असून, छाननीनंतर महायुतीची संयुक्त पत्रकार परिषद होणार आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

✲✲

लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी या निवडणूक तयारीबाबत आढावा बैठक घेतली. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

✲✲✲✲

राज्यात ज्या – ज्या महापालिकांमध्ये शिवसेना – भाजप युती म्हणून निवडणूक लढवली, तिथे महापौर हा युतीचाच होईल, असं छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितलं आहे. ते काल पत्रकार परिषदेत बोलत होते.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेचा हप्ता येत्या दोन दिवसांत जमा होणार असल्याची माहितीही शिरसाट यांनी दिली. ते म्हणाले...

**बाईट – पालकमंत्री संजय शिरसाट**

✲✲✲✲

कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे महापालिकेत महायुतीचाच महापौर होणार असल्याची माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावरून परतल्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत यासंदर्भात बैठक होणार असल्याचंही चव्हाण यांनी सांगितलं.

✲✲✲✲

शिवसेना तसंच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाचं नाव आणि पक्ष चिन्ह या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात अंतिम युक्तिवाद उद्या २३ तारखेला होणार आहे. काल यावर सुनावणी झाली नाही. हे प्रकरण सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती ज्योयमाला बागची यांच्या पीठासमोर सुनावणीस येणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या गटाला दिलेल्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

****

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य समारंभासाठी नवी दिल्लीच्या कर्तव्य पथावर जय्यत तयारी सुरु आहे. देशाची सैन्य सज्जता आणि पथ संचलन पाहण्यासाठी यंदा विविध क्षेत्रातले सुमारे दहा हजार विशेष पाहुणे उपस्थित राहणार आहेत. संचलनामध्ये देशाची संस्कृती, लष्करी पराक्रम आणि गौरवशाली वारसा यांचं सादरीकरण होणार आहे. या सोहळ्यासाठी मराठवाड्यातून निमंत्रित करण्यात आलेल्या मान्यवरांमध्ये उत्साह दिसून येत आहे. धाराशिव जिल्ह्याच्या जकेकूरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी यांना या सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात आलं आहे. सूर्यवंशी यांनी यासंदर्भात आकाशवाणीला अधिक माहिती दिली. ते म्हणाले..

**बाईट – सरपंच अमर सूर्यवंशी**

महाराष्ट्रातून राष्ट्रीय सेवा योजना – एन एस एस च्या चार स्वयंसेवकांनाही या सोहळ्यासाठी दिल्लीला येण्याचं निमंत्रण देण्यात आलं आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातल्या ताडकळस इथल्या शिवम रामेश्वर सुरडकर या विद्यार्थ्याचा समावेश आहे. हा फक्त आपला वैयक्तिक सन्मान नसून, आपल्या आई-वडिलांचा, गुरूजनांचा आणि संपूर्ण NSS परिवाराचा सन्मान असल्याची भावना शिवम् याने आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केली. तो म्हणाला…

**बाईट– शिवम रामेश्वर सुरडकर**

****

गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या हौतात्म्य सत्संग वर्षानिमित्त येत्या २४ आणि २५ तारखेला नांदेड इथं होणाऱ्या सोहळ्यासाठी 'ट्रेन ऑन डिमांड' अंतर्गत मुंबई, चंदीगड आणि दिल्ली इथून २३ आणि २४ तारखेला विशेष रेल्वे गाड्या सोडल्या जाणार आहेत.

दरम्यान, या सोहळ्यानिमित्त लातूर जिल्हा शिक्षण विभागातर्फे ‘हिंद दी चादर’ पथनाट्य स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्ह्यातल्या विविध शाळांमधल्या ३४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं विवेवकानंद महाविद्यालयातल्या विवेकानंद व्याख्यानमालेचा काल राजकीय भाष्यकार अपूर्वानंद झा यांच्या व्याख्यानाने समारोप झाला. सामाजिक. शैक्षणिक तसंच राजकीय बदलांवर त्यांनी यावेळी भाष्य केलं.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात नागपूर इथं झालेला पहिला टी ट्वेंटी क्रिकेट सामना भारताने ४८ धावांनी जिंकला. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारताने २० षटकांत सात गडी गमावत न्यूझीलंडसमोर २३९ धावांचं लक्ष्य ठेवलं, मात्र पाहुणा संघ निर्धारित षटकांत १९० धावाच करू शकला. ३५ चेंडूत ८४ धावा करणारा अभिषेक शर्मा सामनावीर ठरला. मालिकेतला पुढचा सामना उद्या रायपूर इथं होणार आहे.

****